# शासकीयअभियांत्रिकीमहाविद्यालययवतमाळ

(GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING YAVATMAL)

धामणगावरोडयवतमाळ– ४४५००१

Phone No-
Office: 07232 243278
Principal : 07232 238683

website -www.gcoey.ac.in : E mail
office.gcoeyavatmal@dtemaharashtra.gov.in
storesgcoeyavatmal@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र.शाअमय / कंभा / लिलाव-जाहिरात / २०२२-२३ / 3606
दि.२२/११/२०२२

## निर्लेखीत यंत्रसामग्रीच्या लिलावा करीता जाहिरात

या संस्थेतील निर्लेखीत करण्यात आलेली कर्मशाळा, यंत्र व विद्युत अभि. विभागातील यंत्रे व उपकरणे यांचा लिलाव करणे करीता दि.०३/१२/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. विहीत नमुना अर्ज संस्थेतील स्टेशनरी विभागात कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत रु.५०००/- (अक्षरी : रु. पाच हजार फक्त, ना परतावा ) भरुन उपलब्ध आहे. अधिक माहिती करीता कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. सदर जाहिरात व अटी व शर्ती संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर www.gcoey.ac.in वर उपलब्ध आहे.

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
यवतमाळ.

प्रत : श्री. होले ( प्रोग्रामर ) यांना संस्थेच्या संकेतस्थळावर दि.२३/११/२०२२ रोजी प्रकाशीत करणे बाबत.

Scanned by CamScanner

# निर्लेखीत झालेली यंत्रे व उपकरणे यांचा लिलाव करणे करीता खालील प्रमाणे अटी व शर्ती लागू राहतील.

१. यंत्रे व उपकरणे यांच्या खरेदी करण्या करीताचा निविदा फॉर्मचा नमुना या कार्यालयामधील स्टेशनरी विभागात रु.५,०००/- प्रती फॉर्म ( ना परतावा रक्कम ) कार्यालयीन वेळेत दि.०२/१२/२०२२ पर्यंत उपलब्ध आहेत. निविदे सोबत रु.५०००/- ची शासकीय पावती जोडणे आवश्यक राहिल.

२. विहित नमुन्यातील प्रपत्रामध्ये मधील व मोहोर बंद असलेली निविदाच स्विकारण्यात येईल.

३. तसेच जर जास्तीत जास्त दर असलेल्या निविदाधारकास यंत्रेसामग्री विकण्याचे ठरले व त्या नंतरही त्याने सदरील यंत्रसामग्रीची उचल केली नाही तर त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

४. निविदे सोबत अनामत रक्कम ( EMD ) रु.५०,०००/- ( अक्षरी पन्नास हजार चा डी.डी. प्राचार्य शासकीय अभियंत्रिकी महाविद्यालय यवतमाळ, यांचे नांवे काढलेला व देय यवतमाळ असावा ) सोबत जोडण्यात यावा, अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल.

५. आपले मोहोरबंद दरपत्रक निविदा या कार्यालयास दि.०३/१२/२०२२ रोजी ५.००वा. पर्यंत जमा करावे. कार्यालयीन दिलेल्या मुदती नंतर प्राप्त झालेले दरपत्रक निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

६. मोहोरबंद निविदा सादर करतांना त्या सोबत भंगार खरेदी बाबतची सक्षम अधिकारीव्दारा प्राधिकृत केलेली चालू आर्थीक वर्षामध्ये वैध असलेली परवाण्याची ( लायसन ) छायांकीत प्रत स्वसाक्षांकीत ( शीक्क्यासह ) करुन जोडावी. सोबत परवाना धारकाचे पॅन कार्ड, आधार कार्ड यांची स्वसाक्षांकीत छायांकीत प्रत जोडावी.

७. निविदाधारकांना दि.०२/१२/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत (शासकीय सुटीचे दिवस वगळून) एकवेळ जागेवर प्रत्यक्ष यंत्रसामग्रीची पाहणी करण्यास परवानगी आहे. त्यांनी संस्थेचे भांडारपाल यांचेशी संस्थेमधे संपर्क साधावा.

८. ज्या खरेदीदाराचे दरपत्रक निविदा मंजुर होईल त्यांनी नमुद संपुर्ण यंत्रे व उपकरणे, संपूर्ण रकमेचा भरणा करुन स्वयं जावाबदारीवर आदेशाच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत साहित्य घेवून जाणे बंधनकारक राहिल.

९. निर्लेखीत झालेले यंत्रे व उपकरणे आहे ज्या स्थीतीत आहेत त्या स्थीतीत घेवून जाणे बंधंकारक राहील. तसेच सदरील यंत्रसामग्री फावूंडेशनमधुन काढणे, त्यांचे विद्युत पुरवठा कादुन, वाहनामध्ये ठेवण्याची सर्व जवाबदारी निविदाधारकाची राहील.

१०. दरपत्रक निविदा या कार्यालयात दि.०६/१२/२०२२ रोजी दु.१२.०० वा. उघडण्यात येतील. दरपत्रक निविदा उघडण्याचे वेळेस आपण अथवा आपले प्रतीनीधी ( फक्त एक व्यक्ती ) यांना उपस्थीत राहण्यास परवानगी देण्यात येईल.

११. खरेदीदारास नियमानुसार विक्रीकर व सर्वसाधरण कर भरावा लागेल.

१२. यंत्रे व उपकरणे यांच्या खरेदीचा संपूर्ण खरेदीचा भरणा कार्यालयात केल्या नंतरच यंत्रे व उपकरणे कार्यालयाबाहेर नेण्याची परवानगी देण्यात येईल. रकमेचा भरणा केल्याची शासकीय पावती देण्यात येईल.

Scanned by CamScanner

१३. लिलावाची योग्य कींमत न आल्यास कींवा ईतर कोणत्याही कारणास्तव संपूर्ण निविदा रद्द करण्याचे सर्व अधिकार व आवश्यकता वाटल्यास सदर अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार संस्था प्रमुख म्हणजेच प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांना राहील.

१४. कोणत्याही कारणास्तव दरपत्रक मंजुर करणे / नाकारणे या बाबतचे संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकाराकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

१५. विक्रीसाठी असलेल्या यंत्रेसामग्री यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | नग |
|---|---|---|
| ०१. | कर्मशाळा विभाग | २४ नग |
| ०२. | यंत्र अभि. विभाग | १० नग |
| ०३. | विद्युत अभि. विभाग | २१ नग |

दि.२१/११/२०२२

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
यवतमाळ.

प्रत : श्री. होले ( प्रोग्रामर ) यांना संस्थेच्या संकेतस्थळावर दि.२३/११/२०२२ रोजी प्रकाशीत करणे बाबत.

Scanned by CamScanner